प्रेसनोट

दि. २२/०१/२०१८

डेक्कन पोलीस स्टेशन गु.र.नं. १०/२०१८ भादवि कलम ३०२,३०७,३४ आर्म ॲक्ट कलम ३ सह २५ मधील आरोपी जळगाव येथे लॉजवर असल्याची माहिती बातमीदारामार्फत मिळाल्याने मा.डॉ. बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १ पुणे शहर यांचे मार्गदर्शना खाली आम्ही स्वत:, पोहवा ५६९१ सोनवणे, पोहवा १७२९ जगताप, पोना ५८०९ पांचाळ यांचे सह जळगाव येथे जावून आरोपीचा शोध घेतला असता दाखल गुन्हयातील आरोपी रविंद्र सदाशिव चोरगे वय ४१ वर्ष रा. केअर ऑफ पासकंटी,फ्लॅट नं. ०३, निल पदम सोसायटी, अमृतनगर, माणिकबाग सिंहगड रोड पुणे हा मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून डेक्कन पोलीस स्टेशन येथे आणले. त्यांच्याकडे दाखल गुन्हयाबाबत तपास करता त्याने त्याचा साथीदार राहूल चंद्रकांत शिवतारे वय ४१ वर्ष रा. वडगाव बुद्रक पुणे असे दोघानी मिळून गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास दाखल गुन्हयात दि. २१/०१/२०१८ रोजी २०.४५ वा. अटक करण्यात आली आहे. श्रीमती रश्मी शुक्ला सो, पोलीस आयुक्त, पुणे शहर व श्री. रविंद्र कदम, सो, पोलीस सह आयुक्त पुणे शहर यांचे आदेशाप्रमाणे व श्री. रविंद्र सेनगावकर सो, अपर पोलीस आयुक्त सो, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर, श्री. डॉ. बसवराज तेली सो, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १ पुणे शहर, श्री. बाजीराव मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली दाखल गुन्हयाचा अधिक तपास आम्ही स्वत: करीत आहे.

आरोपीच्या विरुध्द यापूर्वी दाखल असलेल्या गुन्हयाची माहिती

१) राहूल चंद्रकांत शिवतारे :- १) सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे गु.र.नं. ३१४/९५ भादवि कलम २७९,३३७ मोटार अधिनियम कलम ११९/१७७
   २) विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणे गु.र.नं. ३२८/१३ भादवि कलम ३२६,३२३,५०४

२) रविंद्र सदाशिव चोरगे - निरंक

